# मराठ्यांचे महापराक्रम


१



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय व्या. वा.
दा. क्र. ८७५८

IRBK-0108178

# …ळावावरील मर्दुमकी




# मोतीतलावावरील मर्दुमकी

★

सुधाकर प्रभु

★

६५ नये पैसे

८१७८८
२८६९३
वा. वा.
२८९३
२८/१२/६०
IRBK-0108178



वोरा ॲण्ड कंपनी पब्लि. प्रा. लि. मुंबई २.

श्री : २६७

मराठ्यांचे
महापराक्रम
पुस्तक १ लें

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति पहिली :
१९६०

किंमत ६५ नये पैसे



प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लि. प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २

लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तरवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥ — श्रीसमर्थ



मराठे आणि पराक्रम ही अभेद्य जोडी आहे. मराठी वीरांनीं आपल्या शक्तीच्या बाहुबळावर पारतंत्र्य झुगारलें आणि युक्ति-बुद्धीच्या चापल्यावर स्वराज्य स्थापलें.

*‘ शक्ति युक्ति जये ठायीं । तेथें श्रीमंत धांवती ॥ ’*

हें सूत्र महाराष्ट्राला त्याच्या राष्ट्रगुरूनें — श्रीसमर्थांनीं केव्हांचेंच शिकविलेलें आहे. त्यांच्या या शक्तियुक्तीपुढें दुष्ट, दुर्जन थकले आणि सज्जन, स्वजन थक्क होऊन गेले.

— पण आपल्याला त्याचा आज विसर पडायला लागला आहे. कारण, तो इतिहासच आपल्यापासून हिरावून घेतला गेला होता.

छे: छे:! असा इतिहास कधीं कोणाला हिरावून घेतां येत नसतो ! निदान आपला — मराठ्यांचा इतिहास तरी असा लेचापेचा खास नाहीं !

आपल्या पूर्वजांनीं असें खूप घडविलें आहे, प्रत्यक्ष करून दाखविलें आहे कीं, जे प्रसंग पराक्रमाचीं उदाहरणें म्हणून जगानें आपल्यासमोर आदर्शवत् ठेवावेत.

अशा या मराठ्यांच्या महापराक्रमाच्या कांहीं कथा इथें सांगितल्या जात आहेत.

नों. दि. २८/१२/६०



# माधवराव पेशव्यांचा दक्षिण दिग्विजय

हैदरला बिदनूरच्या रानांत कोंडून राव माधवानें त्याच्या कंठीं प्राण आणला. राघोबादादाच्या मार्फत पेशव्याची दया भाकून त्यानें आपला जीव वांचवला आणि तह केला. पण हैदर जातीचा कपटी आणि महालबाड! पेशवे स्वारीहून परतल्यावर त्यानें तहाचीं कलमें वाऱ्यावर उधळून लावलीं. पेशव्यांनीं परत हैदरचा मुलूख बेचिराख करून टाकला आणि हैदर परत तहाचीं कलमें घेऊन नाक घासत आला. हैदरचा वकील आपाजीराम पुण्यास येऊन तहाची वाटाघाट करूं लागला. हैदरचा निरोप घेऊन वाटाघाटीस आलेला हा वकील हैदरच्या डोक्यानेंच कपटी डावपेंचांनीं पेशव्यांना अडवूं लागला. असला आंत एक बाहेर दुसरें करण्याचा दुटप्पी प्रकार नीग्रही आणि सरळ वृत्तीच्या राव माधवरावाला मुळीं खपण्यासारखा नव्हता. हैदरचा तह त्यांनीं झटपट उधळून लावला; आणि पुण्यांत घुमलेला स्वारीच्या शिंगाचा आणि तुताऱ्यांचा आवाज परत एकदां उभें कर्नाटक हालवून हैदरच्या काळजाला जाऊन भिडला.

आणि मग झटाझट हुकुमाच्यां थैल्या घेऊन जासूद दौडूं लागले. पटवर्धन-रास्त्यांना निरोप गेले; आणि शत्रूशीं नेहमींच

लढण्याची खुमखुमी बाळगणारे ते दोघे निधड्या छातीचे रणमर्द नरगुंद, गदग ओलांडीत मुळगुंदावर येऊन ठेपले.


पेशवे पुण्यांतून आपल्या आणि वाटेवाटेवर मिळणाऱ्या सरदारांच्या फौजा घेऊन बघतां बघतां तुंगभद्रेवर येऊन पोहोंचले. तिथें गोपाळराव आणि इतर खाशा सरदारांशीं बेत जमला. गोपाळरावानें हैदरच्या पाळतीवर रहावें आणि श्रीमंतांनीं श्रीरंग-पट्टणवर धांव घ्यावी असा डाव ठरला. श्रीमंत लगोलग निघालेहि.

श्रीमंतांचा या वेळचा आवेश आणि सारा नूर आगळाच होता. श्रीरंगपट्टणच्या वाटेवरून दौडतांना वाटेंतील प्रत्येक ठाणें जिंकायचें त्यांनीं ठरविलें. पहिला बळी पडला बुधेहाळचा. बाराशें प्यादें आणि दोनशें पठाण घेऊन हैदरच्या नांवानें लढणारें हें ठाणें तोफांच्या पांच बारांत पेशव्यांनीं सर केलें. तें जिंकून मराठे परत सुसाटत पुढें निघाले. हागलवाडी, हंदिकिरें, चिकनायकनहळ्ळी, कंदिकिरें हीं ठाणीं लगोलग जिंकून दीड लक्षांची खंडणी वसूल करून पेशवे विजयाच्या ललकाऱ्यांत पुढें दौडूं लागले. वाटेवरचीं कित्येक लहान ठाणीं तर त्यांनीं फूटफूट खणून काढून तिथें दिवा लागणार नाहीं अशी व्यवस्था केली! हैदरच्या कुटिल नीतीनें चिडलेल्या, त्याच्या कपटवृत्तीनें भडकलेल्या, संतापलेल्या पेशव्यांचा रुद्ररूप सेनासागर हैदराचा मैलामैलाचा प्रदेश व्यापून, गिळून टाकीत मराठ्यांच्या पराक्रमाची महाकाय लाट सारखी पुढें लोटीत राहिला. श्रीमंतांच्या स्वारीचा हा तुफानी तडाका पाहून श्रीमंतांना अडविण्याचा, समोरासमोर येऊन त्यांच्याशीं दोन हात करण्याचा विचार तर हैदरनें सोडलाच; पण आपला जीव वांचवायसाठीं तो जो मासूरच्या रानांत तोंड दडवून बसला तो बाहेरच येईना. पेशव्यांनाहि तेंच हवें होतें. हैदर जोंपर्यंत समोरा-समोर येऊन लढत नाहीं तोंपर्यंत हैदरचा सारा मुलूख लुटायचें

त्यांनीं ठरविलें. श्रीरंगपट्टणचा रोख सोडून त्यांनीं कोल्हार आणि चिकबाळापूरकडे मोर्चा वळविला. हैदरच्या जाचाला कंटाळलेले सारे नबाब, पेशवे आले म्हणतांच लगोलग आपली फौज घेऊन त्यांच्या आश्रयाला आले.

• • •





चिकबाळापूर-कडे धांवणाऱ्या पेशव्यांच्या सेनेनें पहिला वेढा घातला भैरवगडास. हा गड शहाजी राजे भोसले यांनीं बांधला होता. या वेळीं तो हैदरच्या ताब्यांत असून हैदरनें त्याचा बंदोबस्त कडक ठेवला होता. डोळ्यांत तेल घालून गडाची दौलत जपणाऱ्या हशमांचा जागता पहारा गडावर होता. चिकबाळापूरकडे दौडत येणाऱ्या मराठ्यांना पाहून किल्लेदारानें किल्ल्याचा बंदोबस्त आणखी कडक केला. पडघमवरची टिपरी सतत जागती राहूं लागली. मशालीच्या लालशार उजेडांत नागव्या तलवारी गडावर सतत तळपूं लागल्या.

आणि मराठे गड्यांना तरी काय हवें होतें ? असा प्रतिकार उडवून लावून, निकराची झुंज खेळून, पराक्रमाशीं लढत देऊन मगच विजयश्रीची माळ गळ्यांत ल्यायची ही तर त्यांची जुनी हौस. किल्ला नेकीनें आणि नेटानें झुंजणार म्हटल्याबरोबर त्यांनाहि आवेशाचें उधाण आलें. त्याच रात्रीं गडाला मोर्चे लागले. आणि सतत तीन दिवस गडकऱ्यांची आणि मराठ्यांची झुंज झाली. गडावरून जोराचा प्रतिकार सुरू झाला. बंदुकाच्या फैरीवर फैरी सुटूं लागल्या. तरीहि बहाद्दर मराठे गडी तटाच्या रोखानें सरकण्याचें काम तिळमात्र थांबवीनात. खांद्याला खांदा लावून तटाला भिडणाऱ्या गड्यांतील एखादा गडी वरून सुटणाऱ्या गोळीनें टिपला जायचा. धारातीर्थी पडणाऱ्या आपल्या जिवलग मित्राकडे एकच अश्रुभरला कटाक्ष टाकून आणि दुसऱ्या डोळ्यांत त्याच्या

मृत्यूचा सूड उगविण्याची आग घेऊन मराठा गडी तटाला भिडायचा. तीन दिवस गडावर तोफांचा मारा झाला. गड जराहि दबकला नाहीं. शाबास गडकऱ्यांची आणि तरीहि गड जिंकूंच ही आकांक्षा बाळगणाऱ्या वीर मराठ्यांची !

तिसरा दिवसहि रात्रीला मिळाला. सहस्र करांनीं तापणाऱ्या सवित्यानें गडकऱ्यांचें आणि मराठ्यांचें शौर्य पाहिलें आणि उद्यांच्या लढतीचें चित्र रंगवीत तो अस्ताला गेला. काळ्याकुट्ट रंगाची शाल घेऊन रात्र आली. मराठ्यांची छावणी आणि भैरवगड रात्रीच्या कुशींत शिरून घोरूं लागलीं. सकाळपासून अविश्रांत लढणारी, झुंजणारी शक्ति धरणीच्या आसऱ्याला आली.

रात्र उत्तररात्रीकडे सरकूं लागली. गडावरचे पहारे सोडले तर सारा गड शांत होता. मराठ्यांच्या छावणींतून मात्र त्या काळोखांत त्या शांततेचा भंग न करतां बलदंड गड्यांचें एक पथक बाहेर पडलें. रात्रीच्या काळ्या काळोखाला भेदीत त्यांनीं गडाच्या पश्चिमेची बाजू गांठली. दगडाधोंड्यांच्या आडोशानें आणि झाडाझुडपांच्या आसऱ्यानें तें पथक गडाकडे सरकूं लागलें.

राव माधवाच्या हेरांनीं दोन दिवस तपास करून गडाची ही बाजू हल्ल्यासाठीं निवडली होती; आणि पेशव्यांच्या आज्ञेनें भैरवगड जिंकायला ही मंडळी निघाली होती. भैरवगडाशीं झुंज घेण्यांत आणखी चार दिवस फुकट घालवायला पेशवे तयार नव्हते. हैदरची उभी राजधानी त्यांना खणून काढायची होती. गडासारखीं ठाणीं काबीज करायला ते अधिक वेळ घालवायला तयार नव्हते.

बघतां बघतां ही मंडळी पश्चिमेच्या तटाला भिडली; आणि तटाच्या दिशेनें वर सरकूं लागली. एक-दोन-तीन सारे सारे गडी तटाला भिडले. शिड्यावर शिड्या लागल्या. आणि गडी तट चढूं

लागले. त्या काळोख्या रात्रीं न बोलतां, न हुंकारतां विजयाची वाटचाल करूं लागले. तटाला लावलेल्या शिड्या घसरत होत्या. तटाच्या भिंतीशीं मुंगळ्यागत डसणाऱ्या गड्यांचे हात मध्येंच तटाच्या दगडापासून सुटत होते आणि परत जिवाच्या आकांतानें दगडाला मिठी घालीत होते. गडावरील वस्तीवर पहिला कोंबडा आरवला आणि त्याच वेळीं मराठे तटावर येऊन उभे झाले.

कोंबड्यांची बांग ऐकून या कुशीवरून त्या कुशीवर झालेल्या गडकऱ्यांनीं परत एक आवाज ऐकला — पण तो कोंबड्याच्या आरवण्याचा नव्हता; तो होता रणशिंगाचा. मराठ्यांच्या रणशिंगाचा. तो आवाज गडकऱ्यांनीं ऐकला आणि छावणींतील मराठ्यांनींहि. मराठे गडी ढाल-तलवारीसहीत तयार होते. लागलीच फटफटत्या पहाटेच्या प्रकाशांत हे गडी गडावर धांवून गेले. खुद्द गडावर आणि गडाखालीं मराठ्यांनीं तुफान रणधुमाळी माजविली.



पहाटेच्या साखरझोंपेंत सुखावलेल्या गनिमाला हालवून, जागवून त्यांनीं लढाईला बोलाविलें. आणि बघतां बघतां पहिल्याच हल्ल्याला गड सर झाला.

सकाळच्या सूर्याचीं सोनेरी किरणें गडाच्या बुरजावर उतरलीं, त्या वेळीं त्यांच्या स्वागताला स्वराज्याचा जरीपटका

वाऱ्यावर नाचत होता. उभा दिवस मराठे गड लुटीत होते. गडांतील सारी मंडळी बाहेर पडली. अंगावरच्या वस्त्राशिवाय त्यांना बरोबर कांहीं नेतां आलें नाहीं. घरदार, पैसाअडका सारें तिथल्या तिथें टाकून ते बाहेर पडले. पण राव माधवानें त्याच रात्रीं निरपराधी गडवाल्यांना छावणींत बोलावून जेवण व एकेक वस्त्र देऊन निरोप दिला.

● ● ●




पेशवे दूर गेले हें पाहून मासूरच्या बारींत दडून राहिलेला हैदर बाहेर आला. पेशवा आतां स्वारींत आहे हें बघितल्यावर पेशव्यांनीं घेतलेलीं ठाणीं परत आपल्या कबजांत आणण्यासाठीं हैदर झटूं लागला. त्यानें कांहीं ठाणीं घेतलींहि. पण ही बातमी पेशव्यांना समजतांच त्यांनीं गोपाळरावाला हैदरवर सोडलें. गोपाळराव हैदरवर चाल करून निघाला, एवढी बातमी हैदरला कळली मात्र! हैदर आणि हैदरचे लोक झटाझट ठाणीं मोकळीं करून पळाले. आपली पाठ फिरल्यावर हैदर परत हीं ठाणीं जिंकणार म्हणून गोपाळरावानें कांहीं महत्त्वाचीं ठाणीं सोडून बाकी सारीं ठाणीं जमिनदोस्त केलीं. हैदरला जणुं हें गोपाळरावानें आव्हान दिलें — ‘ जा आणि घे आतां तुझीं ठाणीं कबजांत ! ’

इकडे पेशवे हैदरचा मुलूख कबजांत घेतच होते. चिकबाळापुरास हैदरची शिबंदी भरपूर होती. चिकबाळापूरचा किल्ला घ्यायला फार दिवस लागतील ही भीतीहि पेशव्यांच्या मनांत होती. पण मोर्चे लागल्यापासून चौथ्याच दिवशीं किल्लेकरी शरण आला. त्याच्या बाजूचे सिघाडे व गणेशगड निरोपासरशीच मराठ्यांच्या ताब्यांत आले. नंतर मराठे तलवारी उपसून धांवले नंदीदुर्गावर.

नंदीदुर्ग अजून हैदरच्याच पराक्रमांत मशगुल होता. तो उंच पहाडावर असल्यामुळें बाकी किल्ल्याहून सुरक्षित होता. वाटेवरचे किल्ले घेतले पण आडरस्त्यावरील, डोंगरमाथ्यावरील किल्ल्यांच्या वाटेला पेशवे जाणार नाहींत ही किल्लेदाराची कल्पना. पण डोंगरांत रहाणाऱ्या आणि डोंगरांतच लहानाचे मोठे होणाऱ्या मराठ्यांना डोंगरी किल्ल्यांचें कसलें भय? डोंगर त्यांचा सखा, जिवलग. या डोंगरांनींच अफझुलखानासारखा भीमकाय माणूस दबवून टाकला. या डोंगरांनींच औरंगजेबासारख्या, मराठेशाही नेस्तनाबूत करीन म्हणून प्रतिज्ञा करणाऱ्या दिल्लीपतीच्या सरदारांनी ठायीं ठायीं प्रत्येक दगडावर शरणागतीचें नाक घासायला लावलें. डोंगर म्हणजे दख्खनची दौलत. नंदीदुर्गासारखे असंख्य गड मराठ्यांनीं झुंजविले होते. ते नंदीदुर्ग वगळतील ही बातच कशाला?

डोंगराखालीं असलेले मराठे डोंगर चढून त्याच दिवशीं किल्ल्याच्या दरवाजाला येऊन भिडले, एवढ्या दहशतीनेंच किल्लेदारानें किल्ला पेशव्यांच्या ताब्यांत दिला. मराठ्यांच्या महापराक्रमाचा हैदरच्या सरदारांना केवढा हा दरारा, केवढी ही दहशत! या मोहिमेंत पेशव्यांजवळ विजयश्री हात जोडून उभी होती. पराक्रमी आणि शूर मराठ्यांना त्यांच्या गुणाचें मोल ओळखणारा, त्यांच्या पराक्रमाचे कौतुक करणारा आणि वेळप्रसंगीं त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा राव माधवासारखा पेशवा मिळाला होता. माधवराव अशा कामांत अतिशय दक्ष. किल्ल्याला मोच लागले कीं, स्वारी रात्रंदिवस तिथें हजर. सुरुंग खोदायचें काम असलें तरी तिथेंहि त्यांची पैरवी. आणि या अशा दक्षतेनें आणि सावधतेनेंच विजयश्री त्यांची छावणी सोडून कुठें गेली नाहीं.



2८९७३
भा.सी.
2८९३



# गोपाळरावाचें अपूर्व धाडस

मराठ्यांनीं घेतलेला प्रदेश कांहीं झालें तरी त्यांच्या पंजांतून सोडवायचा अशी इच्छा हैदर मनांत धरून होता. पण हैदरच्या पाठीवर गोपाळराव पटवर्धन सारखा रहात असल्यानें हैदरचा हा बेत कांहीं केल्या जमत नव्हता. पेशवे लांब गेले ही संधी साधून हैदर सैन्य घेऊन बाहेर यावा, तर आमंत्रण दिल्यासारखा पटवर्धन समोर हजर! लहान लहान टोळ्या मराठ्यांवर सोडूं म्हटलें तर मराठे त्यांची बघतां बघतां चटणी उडवीत. गोपाळरावाच्या विचारानें हैदरला झोंप येत नसे. झोपेंत, स्वप्नांत आणि जागेपणीं त्याला धिप्पाड गोपाळराव दिसायचा. आज बारा वर्षें गोपाळराव त्याची दमछाक करत होता, त्याची रसद लुटीत होता, त्याचीं ठाणीं घेत होता; पण बारा वर्षांत हैदरला गोपाळरावाचें कूसहि वाकडें करतां आलें नव्हतें. कारण गोपाळरावहि हैदरचें कपट जाणून होता.

छावणीपासून अर्ध्या कोसावर पटवर्धनांची फौज रात्रंदिन पहारा करायची. रोज दहाबारा कोस अवतींभोंवतीं फिरून यायची. खुद्द गोपाळराव आणि त्याचे भाऊ आळीपाळीनें जाऊन वीसपंचवीस मैलांत फेरा मारून यायचे. रात्रीच्या पहाऱ्याला खुद्द सरदार जातीनं हजर असायचे. त्यामुळें सावध गोपाळरावाची बेसावध फौज कापूं म्हटलें तरी हैदराला तें शक्य

नव्हतें. पण कावेबाज हैदरानें गोपाळरावाला धडा शिकवायचें ठरविलें. आणि छाप्याचा मोठा बेत त्यानें आंखला.

हैदरच्या प्रदेशांतील त्याच्या जातीची रयत ही त्यालाच अनुकूल असायची. हैदरच्या गोटांतील बातम्या काढतांना मराठी हेरांना त्यामुळें अनेक अडचणींना तोंड द्यावें लागे. एक दिवस हैदरनें आपण श्रीरंगपट्टणला जात असल्याचा बोभाटा केला. त्याप्रमाणें लष्कराचें सामानहि पट्टणला जाऊं लागलें. खुद्द हैदरहि श्रीरंगपट्टणास पोहोंचला. मराठ्यांच्या छावणीपासून हैदर आतां चौवीस कोस दूर राहिला होता. परंतु तेथें तीन दिवसांचा मुक्काम करून हैदर एक दिवस एकाएकीं बारा हजार गारदी, चांर हजार स्वार, पंचवीस तोफा व पन्नास उंट घेऊन दिवसरात्र वाटचाल करून मराठ्यांच्या छावणीजवळ येऊन पोहोंचला.

मराठ्यांच्या हेरांनीं गांवकऱ्यांकडून आणलेली बातमी मात्र वेगळी होती. हैदर श्रीरंगपट्टणलाच आहे, अशी त्यांची बातमी होती. हैदरच्याच माणसांनीं गांवांत उठविलेली एक अफवा होती ती. रात्र जवळ आली आणि हैदरच्या सैन्यांतला एक स्वार पटवर्धनांकडे धांवत येऊन सांगूं लागला. "तुमच्यावर हैदरचा छापा येत आहे." त्याच्या त्या शब्दावर विश्वास ठेवावा कीं नाहीं या विचारांत असतांच समोरून तोफांचे बारावर बार गर्जूं लागले. आला ! हैदरचा छापा आला ! केवढी आणीबाणीची वेळ ! अशा अवेळींच्या अपघाती छाप्याच्या मारांतून लष्कर वांचविणें अशक्य; केवळ अशक्य ! मराठ्यांनीं असे गनिमी छापे घालून श्वास घ्यायची फुरसदहि न देतां गनीम अनेकदां कापून काढलेला होता. उभीच्या उभी फौज गारद केली होती. आज मराठ्यांचा गनिमी कावा हैदरानें मराठ्यांवर उलटवला होता. गोपाळराव ! तुझ्या सैनिकीचातुर्याची आणि प्रसंगावधानाची हीच आतां कसोटी !

खरोखरच गोपाळरावाची परीक्षा पहाणारी वेळ आली होती. पण अशा प्रसंगांना तोंड देण्यांतच शूरांना, वीरांना भूषण! गोपाळराव हा हाडाचा सेनानी होता. धाडसी गडी होता. तानाजी-नेताजी-संताजीच्या पराक्रमाचा वारसा अभिमानानें सांगणारा बहाद्दर होता. तोफेचा पहिला बार त्याच्या कानीं येतांच तो घोड्यावर स्वार झाला आणि नौबत, निशाण घेऊन गोटाच्या आघाडीवर उभा राहिला. हाताखालच्या सेनाधिकाऱ्यांना भराभर हुकूम सोडून फौजेला सारी कल्पना दिली. नौबत वाजूं लागली आणि सारे सरदार आणि फौज शिस्तींत येऊन आघाडीस उभी राहिली. नौबतीचा आवाज ऐकून आघाडीवर आलेल्या फौजेवर तोफांचा बेसुमार मारा हैदरनें चालविला. आघाडीवर आलेल्या फौजेची फळी फोडल्याशिवाय मराठ्यांच्या गोटांत आपला प्रवेश होणार नाहीं हें हैदर जाणून होता. त्यामुळें बळ एकवटून तो आघाडीवर आग ओतूं लागला. पण आघाडीवर होता गोपाळराव. गेल्या बारा वर्षांत हैदरच्या प्रदेशांत हैदरला ठायीं ठायीं रडविणारा गोपाळराव पाय रोवून तोफांचा मारा सहन करत त्या आगीच्या वर्षावांत निश्चयानें उभा होता. आणि त्याच्या मागें त्याची उभी फौज. तोफांचे गोळे धडाधड सुटत होते आणि मराठे जायबंदी होत होते; पण घाबरून, भिऊन एकाहि गड्यानें आपली जागा सोडली नाही. आघाडीच्या मागें बाकीची फौज जामदारखाना, डेरे, राहुट्या हालवून तीन कोसावरील जागेवर सुरक्षितपणें नेत होती. प्रत्येक गोष्ट शिस्तबद्ध चालू होती. जणुं हैदरचा छापा आलाच नव्हता. आघाडीवर तोफा गोळे टाकीतच नव्हत्या.

मराठ्यांचा हा सशिस्त प्रतिकार पाहून हैदर अधिकच चिडला. आपल्या साऱ्या तोफा आणि बाणवाले त्यानें आघाडीवर आणले आणि निर्दयपणें तो तोफगोळ्यांचा, बाणांचा वर्षाव

गोपाळरावावर करूं लागला. गोपाळरावाशेजारीं उभ्या असलेल्या त्याच्या हुजऱ्याच्या मस्तकावर एक तोफगोळा येऊन धडकला. त्याचें शिर घेऊनच तो उडाला. हुजऱ्याच्या देहाचे ठिकऱ्यासारखे तुकडे झाले; आणि ते गोपाळरावाच्या अंगावर उडाले. गोपाळरावाचा चुलतभाऊ माधवराव याचा घोडा गोळा लागून ठार झाला; आणि त्याचा गुडघा मोडला. परशुराम पटवर्धनाची घोडी मेली. त्यानें दुसरी घोडी घेतली तिचाहि वळी तोफगोळ्यानें घेतला. तिसरी घेतली तिचीहि तीच गत झाली! गोपाळरावाच्या भोंवतीं असा रणकल्लोळ माजला असतां गोपाळराव, तें मराठ्यांचे मूर्तिमंत धाडस, तो मूर्तिमंत पराक्रम, आघाडीवर निश्चयानें आणि निकरानें तोंड देत हैदरसमोर उभा होता. रात्रीच्या काळोखांत पांच घटका हा मारा मराठ्यांवर अविरत चालू होता. या पांच घटकांत हैदरानें पांचशें तोफगोळे मराठ्यांवर सोडले.

दिशा उजळल्या. मागचें लष्कर सामानासह सुरक्षित जागीं पोहोंचलें होतेंच. उरलेले तीन डेरे गनिमाच्या हातीं सांपडूं नयेत म्हणून पेटवून टाकले आणि सारी फौज मग जवळच्या ओढ्याचा आसरा घेऊन उभी राहिली. मागची सर्व फौज बुधेहाळला पोहोंचली. बुधेहाळला जाऊन ती फौज कापून काढावी म्हणून हैदर टपून होता. पण त्याची वाट आडवायला गोपाळराव दंड ठोकून उभा होता. ओढ्यावर तळ देऊन राहिलेल्या मराठ्यांवर हैदर चालून आला. मराठ्यांनीं त्याच्यावर बेजरब घोडीं घातलीं. रात्रभर गोपाळरावाचें हें पथक आपली फौज वांचवायच्या पराकाष्ठेंत होतें. हैदरनें आपली ताज्या दमाची फौज मराठ्यांवर सोडली. मराठ्यांचे दहा-वीस गडी पडले. अनेक जखमी झाले. तसें, गोपाळरावानें शत्रूवर घोडीं घालूं नयेत असा सक्त हुकूम दिला. आणि आपली खाशी फौज घेऊन तो ओढ्यावरच उभा राहिला.

समोर नागव्या तलवारी घेऊन उभ्या असलेल्या मराठ्यांना भिडण्याचें धाडस मात्र हैदरला झालें नाहीं. मराठ्यांचे घोडेस्वार मैदानांत येतील आणि मग त्यांनां कापून काढूं या उमेदींत हैदर होता. पण गोपाळरावानें घोडीं घालूं नयेत असा हुकूम दिलाच होता. चार घटका दिवस राहीपर्यंत हीं दोन्ही दळें समोरासमोर उभीं होतीं. मराठ्यांची उरलेलीं सारी फौज आतां बुधेहाळला डेरेदाखलहि झाली होती.


अखेर आपण योजलेली ही मोहीम फुकट गेली या निराशेंत हैदर आपली फौज घेऊन परतला. पण तो साडेतीन कोस दूर निघून जाईपर्यंत ओढ्यावरचा मराठ्यांचा लष्करी तळ मात्र हालला नव्हता !

या छाप्यांत मराठ्यांचीं पन्नास घोडीं आणि पंचवीस माणसें मेलीं. पटवर्धन बंधूंनीं आपल्या जिवाची तमा न बाळगतां आघाडी रोखून धरली. तोफेचा गोळा लागून गुडघा फुटलेला माधवराव पटवर्धन पुढें पंधरा दिवसांनीं वारला. पण गोपाळरावानें आणि त्याच्या पराक्रमी सरदारांनीं हैदरची आघाडी रोखली नसती, तर त्या काळोखांत मराठ्यांची सारी फौज बेसावधपणें कापली गेली असती. गोपाळरावांनीं आणि त्याच्या पराक्रमी भावांनीं आघाडीवरची आग पिऊन सारी फौज वांचविली.

माधवराव पेशवे इकडे हैदरचा मुलूख जिंकीत चाललेच होते. त्यांची धाव तुफानी होती. आज नंदीदुर्ग, उद्यां शिलगट्टा, परवां कैवार, तेरवां कोल्हार अशीं ठाणीं जिंकीत, तेथील किल्ले पाडाव करीत, लाखाची खंडणी वसूल करीत पेशवे पुढें सरकतच होते. पुढें तर पेशवे आणि गोपाळराव एक होऊन हैदरचा प्रदेश लुटीत चालले. गोपाळरावानें या अवधींत हैदरचा एक बडा किल्ला घेतला.

हा निजगलचा किल्ला डोंगरावर होता आणि हैद्रच्या खास देख-रेखीखालीं होता; पण टेकडीवर तोफा चढवून तोहि किल्ला घेतला. या स्वारींत सालीना एक कोटि उत्पन्नाचा प्रदेश मराठ्यांनीं लुटून फस्त केला. किल्ले आणि ठाणीं जिंकलीं तीं वेगळींच.


• • •



माधवराव पेशवे मुलुखगिरीवर येऊन बराच काळ लोटला होता. पुण्याला राहून इतर राजकारण करणें या अवधींत शक्य झालें नव्हतें. आणि त्यांची नाजूक प्रकृतीहि आतां अधिक मुलूखगिरी त्यांना करूं देत नव्हती. तेव्हां मग, त्रिंबकराव पेठे यांच्याकडे स्वारीचीं सूत्रें देऊन श्रीमंत पुण्याला परतले.

हैद्रला वाटत होतें कीं, पावसाळा सुरू झाल्यावर मराठ्यांची छावणी पुण्याला जाईल; पण झालें उलटेंच! त्रिंबकराव पेठ्याला घेऊन गोपाळराव परत हैद्रच्या पाळतीवर उभाच! गोपाळरावाची तर हैद्रनें आतां दहशतच घेतली होती. गोपाळरावापासून दूर राहून तो आपला गेलेला मुलूख परत मिळवायच्या कामाला लागला. त्यानें पहिला मोर्चा वळविला चिकबाळापूरकडे. एक हजार गारदी, दोन हजार प्यादीं, सातशें स्वार आणि तीन तोफा असा संभार त्यानें चिकबाळापूरवर सोडला. हैद्रची फौज चिकबाळापूरवर

गेली हें गोपाळरावाला समजलें. एका दिवसांत पंचवीस कोसांची मजल मारून पटवर्धन, घोरपडे आणि रास्ते चिकबाळापूरकडे दौडत सुटले. हैदरची फौज कोसावरून दिसूं लागतांच अवघ्या चारशें स्वारांना बरोबर घेऊन गोपाळराव झंजावाताप्रमाणें त्या फौजेवर धांवून गेला. हैदरच्या सेनासागराला हा तुफान झंजावात क्षणांत जाऊन भिडला. उभा सेनासागर या चारशें गड्यांनीं घुसळून काढला. गोपाळरावाच्या या माऱ्याला उत्तर म्हणून गनीम तोफा डागूं लागला. पण संतापानें पेटलेला सेनानी पटवर्धन त्या तोफगोळ्यांना चुकवून गारद्यांना भिडला. गारद्यांची भिंत फोडीत आणि दोन्ही बाजूंनीं सपासप गारद्यांना कापीत तो त्यांच्या तोफखान्यावर जाऊन धडकला. तोफा डागणाऱ्या तोफचींचीं शिरें त्यानें क्षणार्धांत अंतराळांत उडविलीं आणि तोफखाना ताब्यांत घेतला. तोफांचीं तोंडें झटदिशीं वळून शत्रूवर आग ओकूं लागलीं आणि इतक्यांत मागून रास्ते-घोरपडे तुटून पडले. हैदरच्या सेनेनें बघतां बघतां पळ काढला. हैदरच्या तिन्ही तोफा, बंदुका आणि पांचशें घोडीं मराठ्यांनीं मिळविलीं. गोपाळरावानें



या लढाईंत हैदरची एवढी फौज कापली कीं, मराठ्यांनीं जिंकलेला प्रदेश परत मिळवायच्या कामावर इतरत्र गेलेल्या हैदरच्या टोळ्या परत रानोमाळ पळत सुटल्या.

• • •



# गुरमकोंड्याची गुरगुर संपली !

गुरमकोंडयाचा प्रांत हा हैदरच्या नामी प्रांतांतील एक प्रांत. गुरमकोंडयाचा किल्लाहि बळकट. किल्ल्यावर अफाट दारू-गोळा आणि साडेतीन हजार उत्तम लढाऊ फौज होती. गुरम-कोंडयाचा जहागीरदार मीर रेझा हा हैदरचा मेहुणा. पेशव्यांनीं एकदां त्याच्यावर स्वारी करून त्याला आपल्या चाकरींत आणला होता. पण मीर रेझा परत हैदरकडे गेला. त्याला शासन करून गुरमकोंडा लुटायचा असा मराठ्यांचा फार दिवसांचा विचार होता. मीरचीं बायकामुलें गुरमकोंडयाच्या किल्ल्यावर होतीं. मराठे गुरमकोंडयावर चालून येतांच मीर मराठ्यांकडे येण्याचें करूं लागला. पण ही बातमी हैदरला समजतांच त्यानें मीरला कैदेंत टाकलें.

मीरचा भाचा सैदुमिया मराठे गुरमकोंडयावर चाल करून येत आहेत हें समजतांच गडाच्या बंदोबस्ताला लागला. मराठे मजल दरमजल करीत गुरमकोंडयाची वाट कमी करूं लागले. गोपाळराव पटवर्धनानें गुरमकोंडयाभोंवतींचीं राचोटी, दुवळ, चांभारटेकडी, तळपूर हीं ठाणीं लगोलग घेतलीं आणि त्रिंबकराव पेठ्यानें गुरमकोंडयालाच वेढा घातला.

गुरमकोंडा हें मातबर ठाणें असल्यानें त्याच्या संरक्षणासाठीं पट्टणहून फौज येईल ही मराठ्यांची अटकळ खरी होती.

गुरमकोंड्याच्या मदतीला फौज आली तर वेढ्याचें काम आणखी लांबणार होतें. त्याऐवजीं गुरमकोंड्याच्या वाटेवरच ती फौज अडवून कापावी म्हणून गुरमकोंड्यापासून दहा कोसांवर खासा गोपाळराव ती वाट अडवून उभा राहिला. इकडे त्रिंबकरावानें वेढ्याचा फांस गुरमकोंड्याभोंवतीं घट्ट आवळत आणला. पण किल्लेदार त्याला मुळींच भीक घालत नव्हता. गुरमकोंडा होताहि तसाच बळकट. या किल्ल्याभोंवतीं खोल खंदक होता. आणि तटबंदीहि चांगली भरीव व रुंद होती. तटबंदीपर्यंत मराठ्यांचा अजून शिरकाव झाला नव्हता. जागोजाग बुरुजांवरून, किल्ल्यावरून रात्रंदिवस तोफांचा मारा होत होता. तटाच्या भिंतीला मराठ्यांचे हात अजून पोहोंचायचे होते. तटाचा दगड एकदां या गड्यांच्या पंजांत आला कीं मग ते त्या दगडाला ढेपीच्या मुंगळ्यागत चिकटणार होते. पण अजून हा पल्ला दूर होता. शेवटीं मामानें तटाच्या बुरुजांना सुरुंग लावायचें ठरविलें. किल्ल्यावरून गडगडणाऱ्या तोफगोळ्यांच्या वर्षावांत सुरुंग खोदण्याचें काम सुरू झालें. अचानक धाडकन् एखादा गोळा येऊन कोसळे आणि सुरुंग खोदणारें सारें पथकच्या पथक त्याखालीं गारद होई. पण त्यांची जागा दुसरे शूर मराठे गडी घेत.

मराठ्यांच्या तोफा इतरत्र अडकल्या होत्या त्याहि मामानें आणविल्या आणि किल्लेकऱ्यांच्या तोफगोळ्यांना मराठ्यांच्या तोफगोळ्यांकडून दणदणीत उत्तर मिळूं लागलें. आणि मग मराठे गड्यांचा आवेश नि उत्साह काय वर्णावा ? झटाझटा गडी कामाला लागले. त्यांचीं हत्यारें जमिनींत घुसूं लागलीं. आंतील गर्भाचा वेध घेऊं लागलीं. खंदकाखालून जाऊं लागलीं. आणि बघतां बघतां खंदकाखालून सुरुंगाची दारू तटबंदीच्या पायाला भिडली. आणि मग गड्यांनीं बत्ती दिली. सबंध बुरुजच्या बुरुज वरच्या



शें-पन्नास किल्लेकऱ्यांना घेऊन आकाशांत उडाला. बघतां बघतां ते गडी जमिनीवर आपटून गारद झाले.

पहिला बुरुज असा फत्ते होतांच खास हुजरातीचे गडी त्या बुरुजावर धांवले आणि तो बुरुज त्यांनीं कबजांत घेतला. आणि त्या बुरुजावरून ते निकरानें लढूं लागले. आतां मराठे गडी सैदुमियाला आणि हैदरलाहि आवरणार नव्हते. बुरुज उडवायचें काम आतां मोठ्या उत्साहानें सुरू झालें. एक, दोन, तीन, चार बुरुज परत आकाशांत उडाले. पहिल्या बुरुजांवरून मराठे आतां बाकीच्या बुरुजांवर धांवले. बुरुजाबुरुजांवर मराठ्यांचीं पथकें लंका जाळणाऱ्या रामभक्त हनुमानाच्या अभिनिवेशांत जाऊन बसलीं. आणि मग या बुरुजांवरून मराठ्यांच्या तोफा धडाधड किल्ल्यांत सुटूं लागल्या. आंतील गुरें-माणसें मरूं लागलीं. तरी सैदुमियाचा पीळ कायम होता. तो आशेवर होता हैदरच्या. पट्टणहून फौज येईपर्यंत कसेंहि करून किल्ला लढवायचा त्याचा विचार चालू होता. सैदूमिया! पट्टणहून येणाऱ्या फौजेची आशाच सोड. त्या फौजेचा मार्ग अडवून खासा गोपाळराव उभा आहे. त्याला ओलांडून या किल्ल्याकडे मदतीची धांव घ्यायला आतां काळहि धजणार नाहीं.

पण सैदुमियाला अजून आशा होती. त्यानें रात्रीं रात्रीं गडी लावून किल्ल्याच्या आंतील बाजूनें नवी भिंत बांधून काढली. पण ती भिंत जमीनदोस्त करायला मराठ्यांना किती उशीर! एका रात्रींच मराठ्यांच्या तोफगोळ्यांनीं सैदुमियाच्या कारागिरांची कित्येक रात्रींची मेहनत मातीमोल केली. आणि निराश झालेल्या सैदुमियानें तहाच्या कौलासाठीं मुरारराव घोरपड्याची छावणी गांठली. उदार त्रिंबकरावानें गडांतील प्रत्येक मुलामाणसाला खास बंदोबस्तानें इष्ट स्थळीं जाऊं दिलें. आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदेस मराठ्यांचें निशाण उरीं घेऊन गुरमकोंड्याचे बुरुज उगवत्या उन्हांत तळपूं लागले.

गुरमकोंड्याची शत्रूची वाट आडवून गोपाळराव दंड ठोकून उभा होताच. गुरमकोंड्याच्या मदतीस आणि साधली तर मराठी मुलखांत लूटमार करावी म्हणून हैदरचे तीन बडे सरदार चंद्रोजी जाधव, बाळाजीपंत आणि सैदमहंमद चार हजार स्वार, हजारों गारदी आणि तोफा-जेजालाच रणसंभार घेऊन निघाले होते. ही बातमी गोपाळरावाला समजली आणि त्यांना पुढें येण्याचा अवकाश न देतां गोपाळरावच पुंगनुरापाशीं त्यांना जाऊन भिडला. एकट्या गोपाळरावावर तिघेहि सरदार धांवून आले. गोपाळरावानें आपला धीर खचूं दिला नाहीं. अवसान गाळणारा गडी नव्हताच तो. वेड्या धाडसाचा वाघ तो. तो काय भीक घालतो त्यांना!

चंद्रोजी जाधवाच्या फळीला धडक देऊन पटवर्धन आपल्या घोडेस्वारांना घेऊन पुढें झाला आणि आपल्या घोडदळाचे त्यानें दोन भाग केले. शत्रूला पाठीवर घेऊन पळ काढण्याचा बहाणा करून त्यांनीं गनिमाची सारी फौज मैदानांत आणली. मोकळ्या मैदानांत मराठ्यांच्या घोडदळाची खरी करामत पहावी. बंदुका घेऊन लढणाऱ्या गारद्यांच्या कळपांत एकदां हे भालेबहाद्दर घोडेस्वार घुसले

कीं बंदूक टाकून गारदी पळ काढीत. आणि आतां गोपाळरावानें या तिघांहि सरदारांना असे कैचींत पकडलें कीं, एका बाजूनें तलाव आणि दोन्ही बाजूंनीं गोपाळरावाचें घोडदळ. चंद्रोजी जाधव त्वेषानें पटवर्धनांवर चालून आला. पण मराठ्यांच्या घोडदळापुढें त्यांच्या गारद्याचें कांहीं चालेना. आपला घोडा घेऊन चंद्रोजी पुढें घुसला पण एका भालेबहाद्दरनें त्याचा वेध घेऊन त्याला खालीं आणला. तो जखमी झाला. बाळाजीपंतालाहि मराठ्यांनीं गराडा घालून त्याचा पाडाव केला.

दोन मातबर सरदारांचे असे तीनतेरा झालेले पाहून तिसरा सरदार सैदमहंमद आणि त्याचें सैन्य रानाचा आसरा घेऊन पळत सुटलें. सात-आठशें गारदी मराठ्यांनीं बघतां बघतां कापून काढले. बाकीचे पळाले, जीव घेऊन पळाले. सारें लढाऊ सामान तिथल्या तिथें टाकून वाऱ्याला मागें सारीत पळाले. त्यांच्या साऱ्या तोफा, अडीच हजार बंदुका, तीनशें घोडे हें सर्व सामान मराठ्यांनीं ताब्यांत घेतलें.

• • •





# हैदर ! आतां आपली भेट मोतीतलावावर !

हैदरवरील या स्वारींत मराठ्यांनीं हैदरचें जवळ जवळ अर्धें राज्य जिंकलें होतें. पेशवे आतां प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें जातीनिशी हजर नव्हते, पण त्रिंबकराव पेठ्यास त्यांनीं बिदनूरचा पाडाव करण्यास सांगितलें. बिदनूर म्हणजे हैदरचा प्राण होता. पेशव्यांच्या हुकमाप्रमाणें त्रिंबकराव पेठ्याबरोबर सारे स्वासे सरदार निघाले.

ऑं ?– या सरदारांच्या मालिकेंत खासा गोपाळराव पटवर्धन कोठें दिसत नाहीं ? नाहीं, आतां यापुढें गोपाळराव पटवर्धन स्वारींत दिसणारच नाहीं. त्याची बेफाम घोडदौड आतां परत होणार नाहीं. त्याची गनिमाला चळचळा कापायला लावणारी बिजलीसारखी तलवार परत युद्धभूमीवर चमकणार नाहीं. सावनूरच्या ओढ्यावर आणि अनवडीच्या वाटेवर हैदरला धार्यीं धार्यीं रडवणारा, रणमैदानावर हैदरला थोबाडणारा रणसेनानी गोपाळराव आतां परत कधींहि झंजावाताप्रमाणें येऊन गनिमाला भिडणार नाहीं. गोपाळराव वारला. उन्हातान्हांतून, थंडीवाऱ्यांतून सतत बारा वर्षें मुलूखगिरी करीत राहिलेला हा कुशल सेनानी आतां या ऐन मोक्याच्या वेळेला काळानें उचलून नेला. खासा गोपाळराव पटवर्धन वाखा

होऊन वारला. गोपाळरावाची जागा घेण्यास पटवर्धन घराण्यानें आपला दुसरा गडी दिला. त्या वीरप्रसु वास्तूनें स्वदेशाच्या सेवेसाठीं वामनराव पटवर्धनास या स्वारीवर पाठविलें.

पेशव्यांनीं महाराष्ट्रांतून त्रिंबकरावाच्या मदतीस आणखी सैन्य पाठवून दिलें. त्रिंबकराव तुमकूरवर येऊन या फौजेला मिळाला. आणि मराठी फौजेचा हा प्रचंड सेनासागर हैदरचा मुलूख गिळीत चालला. बघतां बघतां या गड्यांनीं बेलूर, गर्दनगड हे किल्ले जिंकले आणि चेनगिरीवरून शिमोग्याच्या रस्त्यानें ते दौडूं लागले.

मराठे आतां बिदनूरवरच दौड घेत आहेत हें पाहून हैदर कसा गप्प बसेल ? मराठ्यांशीं मैदानांत लढत घेणें हैदरला शक्यच नव्हतें. त्याऐवजीं बिदनूरच्या रानांतच कोंडून मराठ्यांवर छापे घालून त्यांचे लचके तोडावे असा बेत हैदरनें केला. आणि त्यासाठीं भली फौज हैदरनें जमविली. पंचवीस हजार गारदी, आठ हजार स्वार, पंचेचाळीस तोफा, जेजाला अशी भली मोठी सामग्री जमवून तो पट्टणांतून बाहेर पडला. हैदर बाहेर पडल्याची बातमी मराठी हेरांनीं आणली. त्याला बिदनुरास येऊं न देतां बिदनूरच्या वाटेवरच त्याच्याशीं सामना द्यायचा निर्णय त्रिंबकरावानें आणि त्याच्या सरदारानें घेतला. आणि हैदरचा माग काढण्याचें काम दिलें सखाराम हरीकडे.

सखाराम हरी हाहि एक धाडसी वाघ होता. वेळ काळ न पहातां असेल त्या फौजेनिशी तो शत्रूवर कोसळायचा आणि विजयश्री खेंचून आणायचा. हैदरचें अफाट सैन्य वाटचाल करीत पल्ला गांठीत होतें. हा गडी अवघ्या तीनशें लोकांसह, रसद वाहून नेणाऱ्या त्या सैन्यावर तुटून पडला. सात हजार बकरीं आणि अनेक हत्ती व उंट त्यानें परस्पर लांबविले. तेथून परत वाऱ्याच्या गतीनें जो पळाला तो नागमंगलला आला. हैदरचें लष्कर एवढ्या जवळ आलें

आहे याची पर्वा न करतां त्यानें उभें नागमंगल लुटलें आणि वेळू-रला येऊन त्रिंबकरावाकडे लगोलग येण्याविषयीं जासूद पाठविला.

सखाराम हरीचा हा निरोप येतांच त्रिंबकरावानें कूच केलें. मराठ्यांचा सेनासागर आतां वेळूरच्या दिशेनें सरकूं लागला. पटवर्धन, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, गायकवाड यांचीं पथकें आणि पेशव्यांची खास हुजरातीची फौज घेऊन अप्पा बळवंत असे खासे सरदार आपली वीस हजारांची फौज घेऊन हैदरला भेटायला निघाले ! वीस कोसांची मजल मारून दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या प्रहरालाच ते हैदरच्या गोटाजवळ आले. हैदरचा गोट दिसतांच मराठ्यांचें वीररक्त सळसळून उठलें. पटवर्धन, गायकवाड आणि हुजरातीचे सैनिक हे गर्दी तर आल्या-आल्याच हैदरला भिडले. हैदर डोंगराचा आणि झाडीचा आसरा घेऊन राहिला होता. तरीहि बेधडक मराठ्यांनीं आपलीं घोडीं हैदरच्या सेनेंत घुसविलीं. तुफान रणकंदन माजलें. मराठ्यांचे अनेक गर्दी पडले. पण अखेरी-अखेरीला मराठ्यांनीं पराक्रमाची शर्थ करून हैदरच्या फौजेंत शिरून बेफाम कत्तल आरंभिली. आणि शत्रूचीं तीनशें घोडीं पाडाव करून आणलीं.



दुसऱ्या दिवसाची पहांट फटफटली आणि हैद्र आपला तोफखाना घेऊन पुढें आला. आज मराठ्यांनीं वेगळाच डाव आरंभला होता. हैद्र मराठ्यांवर तोफगोळे सोडूं लागला. उलट मराठे मागें येऊन कांहींहि हालचाल न करतां उभे राहिले. पण मराठे खरोखरच स्तब्ध, स्वस्थ होते का ? मराठ्यांची फौज मागें सरकत नव्हती; ती एक गळफांस विणीत होती. हैद्रला मध्यें घेऊन ती कडेनें सरकत होती. या लढाईंत हैद्र सडकून मार खाणार आणि आयत्या वेळेस जीव बचावण्यासाठीं पळ काढणार हें त्यांच्या पूर्वानुभवावरून मराठ्यांना माहीत होतें. त्या दृष्टीनें दक्षिणेस पटवर्धन आणि धायगुडे, उत्तरेस अप्पा बळवंत आणि त्रिंबकराव असा मार्ग रोखून मराठ्यांनीं हैद्रास कोंडून धरलें. दोन दिवस मराठ्यांनीं हैद्रवर हल्ला केला नाहीं. आणि हैद्रहि हल्ल्यासाठीं गोट सोडून बाहेर आला नाहीं.

हैद्र आतां पळायचे बेत आंखीत असेल या दृष्टीनें अधिक बंदोबस्त करावा आणि हैद्रचा झाडींतून पळण्याचा पश्चिमेचा मार्ग आडवावा या दृष्टीनें दक्षिण बाजूस चारशेंची टोळी ठेवून पटवर्धन, धायगुडे, गायकवाड आणि आनंदराव गोपाळ त्या मार्गावर आले. हैद्रची रसद त्या गोटांत चालली होती. या गड्यांनीं हल्ला करून त्याची पुरी रसद मारली आणि हत्ती, घोडे जिंकून आणले. रसद लुटल्यावर हैद्रच्या गोटांत हल्लकल्लोळ माजला. नाचणीचें पीठ रुपयाला तीन शेर झालें आणि उभ्या फौजेला फाका पडण्याची बिकट वेळ येऊन ठेपली.

शत्रूच्या गोटांत भुकेची आग त्यांचा गोट जाळीत असतांना तोफगोळ्यांची आग टाकायला मराठ्यांनीं सुरुवात केली. एका उंच टेकडीवरून मराठ्यांच्या तोफा हैद्रच्या गोटावर आग ओकूं लागल्या. हैद्रची छावणी भाजून निघूं लागली.

बिदनूरच्या झाडींत मराठ्यांवर छापे घालून त्यांचे लचके तोडण्याचे हैदरचे बेतहि या तोफगोळ्यांनीं करपून जाऊन त्याची राख झाली. मराठ्यांनीं अटकळ केल्याप्रमाणें त्याच रात्रीं हैदर श्रीरंगपट्टण गांठायचा विचार करूं लागला. श्रीरंगपट्टण तेथून अवघें पांच कोसांवर होतें. पल्ला जवळचा होता, पण प्रयत्न कठीण होता. हैदरची अशी आयत्या वेळीं पळ काढण्याची जुनी खोड मराठ्यांना माहीत होती. ते सावध होते. हैदर गोटांतून कधीं बाहेर पडतो आणि पट्टणच्या वाटेला लागतो ही बातमी काढण्यासाठीं पांचशें मराठ्यांची टोळी सावधपणें सभोंवतीं फिरत होती.

अवघी सहा घटका रात्र झाली आणि हैदर गोटांतून बाहेर पडला. सावधपणें, मांजराच्या पावलांनीं, दबत-दबकत त्याच्या छावणीला लागून असलेल्या रानांतून तो पट्टणच्या वाटेला लागला. ‘ अवघ्या पांच कोसांचा तर पल्ला. हां हां म्हणतां पट्टण गाठूं. मराठे बसतील हात चोळीत ! ’ असे मांडे खात खासा हैदर खुश होऊन पट्टणची वाट धरूं लागला आणि एवढ्यांत पाळतीवर असलेल्या मराठ्यांच्या पांचशेंच्या टोळीनें अगदीं बेजरब धडक हैदरला दिली. आणि त्याच वेळीं आपल्या छावणींत ‘ हैदर पट्टणला पळत असल्या ’ची बातमी दिली.

रात्र काळोखी असल्यानें आपल्यावर हल्ला करणारे मराठे पांच आहेत का पांचशें आहेत का पांच हजार आहेत याचा अंदाज हैदरला लागेना. मराठ्यांचा तो बेजरब हल्ला पाहून हे गडी हजारांनीं तरी असावेत या कल्पनेनें त्यानें मराठ्यांवर तोफगोळे टाकायला सुरुवात केली. पन्नास हजारांचें सैन्य घेऊन आपण बंदोबस्तानें आणि गुपचूपपणें निघालों आहोंत ही गोष्ट हैदर नेमकी विसरला. तोफांच्या आवाजानें हैदरच्या गुप्ततेच्या ठिकऱ्या



उडाल्या. ते तोफगोळ्यांचे आवाज म्हणजे मराठ्यांची छावणी जागी करायला हैदरनें धाडलेलें निमंत्रणच होतें. थोड्याच अवकाशांत मराठ्यांचीं पथकें हैदरवर येऊन ठेपूं लागलीं. आतां कुठलें पट्टण ! हैदर पुढें चालला म्हणजे मागून मराठ्यांनीं त्याच्या लष्कराचे लचके घ्यावे. त्यानें थांबून तोफा-बंदुकांचा मारा करावा तर यांनीं एका बाजूला झाडींत लपून दुसऱ्या बाजूनें प्रगट होऊन हैदरच्या लष्कराचा फडशा पाडावा. तो पुढ सरकला कीं परत मराठ्यांनीं त्याला भिडावें. अशा रीतीनें हैदरची फौज कापीत त्याला बेजार करीत, सारी रात्र मराठ्यांनीं त्याला यथेच्छ दमविला. सकाळ झाली आणि हैदर त्या बारींतून बाहेर पडला. रात्रभर नऊ

तासांचा पल्ला मारून अवघें दोन कोस अंतर हैदरनें कापलें. बस्, अवघे दोन कोस!

सकाळ झाल्याबरोबर मराठ्यांनीं आतां हल्ल्याला पद्धतशीर स्वरूप आणलें. साऱ्या टोळ्या एकत्र झाल्या आणि माऱ्याचा बेत जमून आला. हैदरनेंहि आतां प्राणपणानें झुंज द्यायची ठरविली. त्यानें तोफा-बंदुकांच्या गोळ्यांचा नुसता पाऊस मराठ्यांवर पाडला. सारें आकाश रणगर्जनांनीं भरून निघालें. ढग गडगडावे तसे आवाज झाले. आणि उभय सैन्यें अटीतटीनें झुंजूं लागलीं. हैदरपाशीं दारुगोळा भरपूर असल्यानें हैदरचा प्रतिकार अधिक समर्थपणें होऊं लागला. मराठे मागें हटूं लागले आणि हैदर आणखी एक कोस पुढें सरकला. पट्टण जवळ आलें. अवघें दोन कोस राहिलें. 'आतां आणखी थोडा वेळ मराठ्यांना थोपवून धरलें म्हणजे पट्टण आपलेंच आहे.' हैदर अटीतटीनें पट्टणच्या दिशेनें सरकूं लागला. हैदर आतां हातचा निसटणार आणि आपण जमविलेला बेत मोडून पडणार हे वामनराव पटवर्धनानें ओळखलें.

वेळ आणीबाणीची आहे, पराक्रम गाजविण्याची आहे, धाडस करण्याची आहे. आतां कांहींतरी केलें पाहिजे. हैदरचा मार्ग रोखला पाहिजे. त्याची पन्नास हजारांची फौज अशी डोळ्यांदेखत जाते आहे. मराठ्यांच्या छाताडावर पाय रोवून पुढें सरकते आहे.

वामनराव! आतां काय बघतोस? कसला विचार करतोस? अरे, पटवर्धनाचा पराक्रम आठव. गोपाळराव पटवर्धन वारला एवढेंच हैदर जाणतो. गोपाळरावाच्या पराक्रमाचा वारसा सांगणारा त्याचा भाऊ या मोहिमेंत आहे हें त्याला तुझ्या तलवारीच्या तीखट धारेनें दाखव. हीच वेळ आहे पटवर्धनाच्या पराक्रमाचा वारसा सांगण्याची. आतां हैदर निसटला कीं निसटलाच. येवढ्या

फौजेनिशी तो परत पट्टण झुंजवील. गोपाळरावाच्या खांद्याला खांदा लावून लढलेले तुझे भाऊ नीळकंठराव आणि परशुरामभाऊ तुझ्याबरोबर आहेत. घे त्यांना बरोबर आणि घूस हैदरच्या फौजेंत.

वामनराव आणि त्याच्या दोन्ही बंधूंनीं आपलीं घोडीं बेजरब हैदरच्या फौजेंत घुसविलीं. पटवर्धनांचीं पथकें हैदरच्या खास गारद्यांना जाऊन भिडलीं. बंदुकवाल्या गारद्यांनीं बेफाम गोळ्यांचा मारा सुरू केला, पण पटवर्धन बंधु गारद्यांची फळी मोडीत चालले. आघाडीवरची फौज कापून पटवर्धन आंत शिरले. वामनरावानें पराक्रमाची शर्थ केली. त्यानें सरळ घोडा घुसवला आणि पुढं धांव घेतली. हैदरच्या आग ओकणाऱ्या तोफखान्यामुळें आडव्या येणाऱ्या गारद्यांना तलवारीच्या फटक्यानें दूर सारीत वामनराव सरळ निघाला; आणि त्याच्या मागून त्याचा भाऊ नीळकंठराव. दोघेहि गारद्यांच्या सेनेंत घुसत असतां हैदरच्या एका बंदुकवाल्या गारद्यानें नीळकंठरावाला टिपलें. नीळकंठराव घोड्यावरून खालीं आला.

वामनरावानें क्षणभरच घोड्यावरून कोसळणाऱ्या निळ-कंठरावाला पाहिलें आणि तो त्वेषानें परत शत्रूवर तुटून पडला. रणकालीचें रूप घेऊन वामनराव गनिमाला कापून काढूं लागला. वामनरावानें आणि त्याच्या पथकांतील गड्यांनीं हदरची आघाडी पार फोडून काढली. आणि याच वेळीं त्रिंबकरावानें पिछाडीवर आणि इतर सरदारांनीं दोन्ही बाजूंवर बेदम हल्ला केला. हैदरच्या फौजेचा विश्वास डळमळला. हैदरला मागें टाकून त्याच्यापुढें त्याचे हे पळपुटे वीर पळूं लागले. हैदर तरी थांबतो कशाला? आपलें सारें सैन्य तसेंच वाऱ्यावर सोडून हैदर पळाला. त्याचे पांच-सात हजार गारदी बंदुकांचें ओझें तिथल्या तिथें टाकून पळाले. मोठे मोठे सरदार भिकाऱ्याचा,



फकिराचा वेश घेऊन जीव वांचवीत पळाले. बाकीचे दहा हजार स्वार आणि पंधरा हजार गारदी मराठ्यांच्या तळपत्या तलवारींना बळी पडले. हैदरची सारी फौजच्या फौज मोतीतलावाच्या साक्षीनें मराठ्यांनीं धुळीस मिळविली. हैदरच्या पंचेचाळीस तोफा, आठ हजार घोडीं, पंचवीस हजार बंदुका, दारुगोळा, पालख्या, हत्ती सारें सारें मराठ्यांनीं ताब्यांत घेतलें.

दुसऱ्याच दिवशीं मेलकोट्यावर हल्ला करून तें ठाणें मराठ्यांनीं घेतलें आणि ते पट्टणच्या वाटेवर दौडूं लागले. हैदरचें सारें राज्य जिंकून त्याला फकीर बनवायचें त्रिंबकरावानें ठरविलें. हैदरकडे आतां बिदनूर आणि पट्टण एवढेच प्रांत होते. दोन-चार महिन्यांच्या आंत मराठ्यांनीं तेंहि घेतले असते. ‘पन्नास पन्नास कोसांत दिवा लावावयास मी एक गांव देखील ठेवणार नाहीं; सारा मुलूख ओसाड करीन’ अशी प्रतिज्ञाच त्रिंबकरावानें केली. मोतीतलावावर हैदरची जिलेबी साफ मारली होती. त्याचा कणाच पटवर्धनानें जणुं मोडला होता. मुरारराव घोरपड्याला मध्यस्थी करून हैदर तहाचा कौल मागूं लागला. पण त्रिंबकराव हैदरचें कांहींच ऐकायला तयार नव्हता. बिदनूर आणि पट्टण खणून काढल्याशिवाय त्रिंबकराव आतां गप्प बसणार नव्हता.

हैदर ! तुझी अवाढव्य फौज मोतीतलावावर मराठ्यांनीं मातीमोल केली. तुझ्या गनिमी काव्याचा त्यांनीं धुव्वा उडविला.

तुझ्या कपट, क्रौर्य आदि साऱ्या दुर्गुणसमुच्चयाला एकवटून तूं केलेल्या साऱ्या हिकमती फसल्या. तुझ्या प्रदेशांत, तुझ्या राज्यांत, तुझ्या मुलखांत हजारों मैल दूर येऊन मराठ्यांनीं तुला ठायीं ठायीं रडविलें. हैदरअल्ली, लक्षांत ठेव, हे मराठे आहेत. 'महाराष्ट्रराज्या'चे वारसदार आहेत.

• • •

त्रिंबकराव विदनुरावर निघणार होता. पण विदनुरचें आणि हैदरचेंहि नशीब बलवत्तर होतें ! – पेशव्यांनीं त्रिंबकरावाला परत बोलाविलें.

त्र्यंबकराव आतां मागें फिरा. पेशवे तुम्हांला मृत्युशय्येवरून बोलवीत आहेत. माधवराव पेशवे तुमचा अखेरचा रामराम घेण्यासाठीं थेऊरहून बोलवीत आहेत. पानपतावर विझलेल्या मराठी पराक्रमाची अस्मिता जागविणाऱ्या, फुलविणाऱ्या माधवराव पेशव्यांची जीवनज्योत मालवूं पहाते आहे. घरच्या आणि दारच्या शत्रूला जरब दाखवून मराठ्यांच्या पराक्रमाचे दिग्विजयी झेंडे परत उभ्या भारतांत नाचविणारे पराक्रमी पेशवे आतां मृत्युशय्येवर आहेत. त्रिंबकराव मागें फिरा; हैदर देत असलेली पन्नास लक्षांची खंडणी घेऊन लवकर मागें फिरा. मृत्युशय्येवरील पेशव्यांना अखेरचा मुजरा करण्यासाठीं, आतां मागें फिरा.

• • •



IRBK-0108178